POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-५० ● मुंबई, सोमवार,२२ सप्टेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

Sharad Navratri Colors 2025

| | |
|---|---|
| Sep 22, Monday | White |
| Sep 23, Tuesday | Red |
| Sep 24, Wednesday | Royal Blue |
| Sep 25, Thursday | Yellow |
| Sep 26, Friday | Green |
| Sep 27, Saturday | Grey |
| Sep 28, Sunday | Orange |
| Sep 29, Monday | Peacock Green |
| Sep 30, Tuesday | Pink |

# राज्यात पुन्हा वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता

## राज्यात पावसाचा इशारा; वादळी वारे, विजांचा कडकडाट, मुसळधार पाऊस कुठे?

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

राज्यात पुन्हा विजांच्या गडगडाटासह मुसळधार पावसाची शक्यता असून हवामान विभागाने मराठवाडा आणि विदभार्तील जिल्ह्यांना यलो अलर्ट दिला आहे. २१ सप्टेंबर रोजी राज्यातील काही जिल्ह्यात यलो अलर्ट जारी करण्यात आला असून नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्यातील काही भागात मागील दोन तीन दिवसांपासून ढगाळ वातावरण असून काही भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला. काही भागात शनिवारी पावसाच्या सरी बरसल्या.

दरम्यान, पुढील चार ते पाच दिवस राज्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. हवामान विभागाने पुढील पाच दिवसांसाठी सर्वच जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. मावेळी काही भागात मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा अंदाज असून काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. दरम्यान, उत्तर अंदमान समुद्रात म्यानमारच्या किनाऱ्यालगत सोमवारपर्यंत चक्राकार वाऱ्यांची स्थिती तयार होण्याची शक्यता आहे. या वाऱ्यांच्या प्रभावामुळे २५ सप्टेंबरपर्यंत हवेचा कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. या चक्राकार वाऱ्यांपासून दक्षिण मध्य महाराष्ट्रापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा विस्तारला आहे. दक्षिण उत्तर प्रदेशापासून मराठवाड्यापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा कायम आहे. राज्यात सर्वत्र रविवारपासून पावसाची शक्यता आहे. काही भागात मुसळधार तर काही भागात हलक्या ते मध्यम सरी बरसतील. मुंबईतही काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पावसाचा अंदाज आहे. दरम्यान, मुंबईत मागील काही दिवस पावसाने ओढ दिल्यामुळे उकाडा सहन करावा लागत आहे. तापमानातही काहीशी वाढ झाली आहे. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात शनिवारी ३०.२ अंश सेल्सिअस, तर सांताक्रूझ येथे २१.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. सांताक्रूझ येथील तापमान १ अंशाने अधिक नोंदले गेले. रायगड, रत्नागिरी, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव या जिल्ह्यात मेघगर्जनेसह पाऊस पडणार आहे तर मुंबई, ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, जळगाव, कोल्हापूर, सातारा, सांगलीमध्ये हलक्या ते मध्यम सरींचा पाऊस पडणार आहे.




### मराठवाड्यात यलो अलर्ट

मराठवाड्यात ढगफुटीसदृश्य पावसाचा तडाखा सुरू असून आज पुन्हा मुसळधार पावसाची शक्यता आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे ढगाळ वातावरण, तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल.

जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव येथे विजांचा कडकडाट, ३०झ४० किमी वेगाने वारे, काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मराठवाड्यात २४ सप्टेंबरपर्यंत पावसाचा जोर कायम राहू शकतो.

**कोकण व मुंबई परिसर**

मुंबई शहर व उपनगरांमध्ये आज आकाश ढगाळ राहील. काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस अपेक्षित आहे.

रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांना यलो अलर्ट.

ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग येथे विजांसह वादळी वाऱ्यांसह जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली.

**पश्चिम महाराष्ट्र**

पुणे, सोलापूर जिल्ह्यांना यलो अलर्ट.

पुण्याचा घाटमाथा, सातारा, सांगली, कोल्हापूर येथे दुपारी किंवा संध्याकाळी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस होऊ शकतो.

**उत्तर महाराष्ट्र**

नाशिक, अहमदनगर येथे यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

नाशिकचा घाट भाग, धुळे, नंदुरबार, जळगाव येथे विजांच्या गडगडाटासह मध्यम पावसाची शक्यता आहे.

**विदर्भात पावसाचा जोर**

विदभार्तील सर्व ११ जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. अमरावती, अकोला, यवतमाळ, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोलीसह संपूर्ण विदर्भात आज मुसळधार पावसाची शक्यता आहे.

मराठवाडा, विदर्भासह राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये आज व पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहील. नागरिकांनी व शेतकऱ्यांनी हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करावे.

**शेतकऱ्यांना सल्ला**

सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असून, पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे.

* शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचे संरक्षण करावे.

* शेतात पाणी साचू नये यासाठी निचरा व्यवस्थेची काळजी घ्यावी.

* वादळी वाऱ्यांपासून सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा.






## पत्रकारांवर जीवघेणा हल्ला, मारहाणप्रकरणी मोठी अपडेट



■**नाशिक। प्रतिनिधी,**

नाशिक त्र्यंबकेश्वर येथील स्वामी समर्थ केंद्राजवळील कमानी परिसरात पत्रकारांना काही गावगुंडांकडून मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेनंतर पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून, मंत्रालयातूनही याची गंभीर दखल घेण्यात आली आहे.

नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे साधू महंतांच्या बैठकीचे वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या नाशिकच्या इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या तीन पत्रकारांवर गावगुंडांनी जबर हल्ला केला. हा हल्ला पार्किंग वासुलीच्या बाचाबाचीतून करण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या हल्ल्यात तीन ते चार पत्रकार गंभीर जखमी झाले असून, सध्या त्र्यंबकेश्वरच्या शासकीय रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. ही मारहाण का करण्यात आली याचा खुलासा पीडित पत्रकाराने नुकताच एका वृत्त वाहिनीसमोर केला आहे. या हल्ल्यात पुढारी न्यूज चॅनेलचे प्रतिनिधी किरण ताजणे गंभीर जखमी झाले आहेत. घटनास्थळी उपस्थित असलेल्या किरण ताजणे यांनी मारहाणीच्या घटनेवेळी नेमकं काय घडलं याची सविस्तर माहिती त्यांनी वृत्तवाहिनीला दिली. किरण ताजणे म्हणाले, त्र्यंबकेश्वर येथे साधू महंतांच्या बैठकीचे वार्तांकनासाठी आलो आहे, असे सांगूनही त्यांना मारहाण केली गेली. सात ते आठ जणांच्या टोळक्याने त्यांच्यावर लाठ्या आणि दांडक्यांनी बेदम मारहाण करत हल्ला केला. राज्यभरातून या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला आहे, तसेच या घटनेची गंभीर दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेत, आरोपींवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानंतर, पोलिसांकडून आरोपींविरुद्ध पत्रकार संरक्षण कायदा, जीवे मारण्याचा प्रयत्न तसेच दंगल माजवल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी प्रशांत राजू सोनवणे, शिवराज धनराज आहेर, ऋषिकेश योगेश गांगुर्डे आणि त्यांच्या साथीदारांवर गुन्हा दाखल करत या तिघांना अटक केली आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असून अधिक माहिती अपेक्षित आहे. या घटनेमुळे महाराष्ट्रातील राजकारणात खळबळ उडाली आहे. तसेच या धक्कादायक घटनेनंतर पत्रकारांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त होत आहे.

## यूपी, बिहारींना पंजाबमध्ये विरोध, घरे भाड्याने न देण्याचं आवाहन



**पंजाबमध्ये नक्की काय घडलं?**

पंजाबमधील होशियारपूरमध्ये 9 सप्टेंबर रोजी एका पाच वर्षांच्या मुलाची हत्या झाली. हा मुलगा खेळत असताना गायब झाला. ग्रामस्थांनी शोध घेतला तरी सापडला नाही. अखेर पोलीस ठाण्यात तक्रार केली. त्यानंतर सीसीटीव्ही कॅमेरे तपासल्यानंतर कुणीतरी अपहरण केल्याचे दिसले. पोलिसांनी शोध घेऊन अपहरणकर्त्याला अटक केली. तो उत्तर प्रदेशचा होता. पोटासाठी होशियारपूरमध्ये मजुरी करत होता. त्याने त्या बालकाची हत्या केली होती आणि पोलिसांनी पकडले तेव्हा तो नशेत होता.

■**चंडिगड। प्रतिनिधी,**

उत्तर प्रदेश तसेच बिहारमध्ये मोठ्या प्रमाणात उद्योग नाहीत. शिवाय येथील राजकीय इच्छाशक्तीदेखील कमी पडते. त्यामुळे यूपी, बिहारमधील लोक पोटापाण्यासाठी अनेक राज्यांमध्ये जातात. पंजाबमध्येही मोठ्या प्रमाणात यूपी, बिहारी मजूर आढळतात. मात्र, काही दिवसांपासून पंजाबमधील वातावरण उत्तर प्रदेश, बिहारींविरोधात तापले आहे, समाज माध्यमांवरून यूपी, बिहारींविरोधात आग ओकली जात असल्याने पंजाबमधील परप्रांतीय पुन्हा यूपी, बिहारकडे वळू लागले आहेत. त्यामुळे रेल्वे आणि वाहतुकीच्या साधने फुल्ल झाली आहेत.

या घटनेनंतर होशियारपूरमधील वातावरण तापले. तातडीने 27 गावांच्या सरपंचांनी बैठक घेतली आणि परप्रांतीय यूपी, बिहारच्या लोकांचे पोलिसांनी व्हेरिफिकेशन करावे आणि त्यांना घरे देऊ नये, अशी आग्रही मागणी केली. या घटनेनंतर हे लोण पंजाबमध्ये पसरले. गावागावांमधून यूपी, बिहारच्या लोकांविरोधात ह्यभैया भगाव, पंजाब बचाओह्ल अशी मोहीम सुरू करण्यात आली आहे.


**पंजाब बचाओ**

पंजाबमधील अनेक शहरे आणि गावांमध्ये मजुरी करण्यासाठी आलेल्या लोकांविरोधात वातावरण तयार झाले आहे. गुन्हेगारीमुळे पंजाबमध्ये उत्तर प्रदेश तसेच बिहारमधून आलेल्या मजुरांविरोधात वातावरण निर्माण झाले आहे. भैया भगाव, पंजाब बचाओ, अशी मोहीम सुरू असून यूपी आणि बिहारींना भाड्याने घरे देऊ नका, तसेच त्यांना रेशनकार्ड, मतदार कार्डही बनवून देऊ नका, अशी मागणी केली जात आहे. एवढेच नाही तर गुरुद्वारामधूनही परप्रांतीयांविरोधात आवाहन केले जात आहे. मात्र, एकाच्या चुकीची शिक्षा इतरांना का, असाही सवाल या निमित्ताने केला जात आहे.

## डिजिटल अटक... मुंबई पोलीस आणि निवृत्त बँकरला 23 कोटींचा चुना, काय घडलं?

■**मुंबई । प्रतिनिधी,**

ॉएखाद्या उद्योगाची उलाढाल 10-20 हजार कोटींची असते. मात्र, गेल्या वर्षी सायबर गुन्हेगारांनी लोकांना ठकवून तब्बल 22 हजार 845 कोटींची काळी कमाई केली आहे. एखादा उद्योग समूहदेखील सायबर गुन्हेगारांच्या आर्थिक उलाढालीमुळे दबून जाईल, अशी स्थिती आहे. अशातच आणखी सायबर गुन्हेगारांनी आणखी एक मोठा डल्ला मारला आहे. त्यांनी चक्क मुंबई पोलिसांचे नाव वापरून निवृत्त बँकरचे बँक खाते 23 कोटी रुपयांनी हलके केले आहे. डिजिटल अॅरेस्टमधील आतापर्यंतची ही सर्वांत मोठी फसवणूक आहे. या प्रकरणी बँकरने शुक्रवारी (19 सप्टेंबर) तक्रार दाखल केल्यानंतर ही धक्कादायक फसवणूक समोर आली आहे. दिल्लीतील हौज खास जवळील गुलमोहर पार्क परिसरात हा बँकर (78) राहतो. 1 ऑगस्ट रोजी त्याला लँडलाइनवर एक कॉल आला. कॉल करणाऱ्यांनी मुंबई पोलीस असल्याची ओळख दिली. त्यावेळी मुंबईतील लँडलाइन त्याच्या आधार कार्डशी जोडण्यात आल्याचे सांगितले. नंतर पुन्हा फोन करून बँकरचे आधार कार्ड दहशतवादी निधीसाठी वापरल्या जाणाऱ्या बँक खात्याशी लिंक असल्याचे सांगितले. एवढेच नाही तर पहलगाम दहशतवादी हल्ल्यासाठी दहशतवाद्यांना दिलेल्या पैशांचाही या बँकरच्या आधार कार्डशी संबंध असल्याचे सांगितले. या माहितीने बँकर हादरून गेला. बँकर घाबरल्याचे लक्षात आल्यानंतर सायबर गुन्हेगारांनी बँकरकडे त्याच्या बँक खात्यांबद्दल, मालमत्ता, डीमॅट खात्यांबद्दल आणि कुटुंबातील




सदस्यांबद्दल वैयक्तिक माहिती मागितली. त्यानंतर बँकरला डिजिटल कोटार्चा बनावट आदेश पाठवला. शिवाय त्याला बनावट डिजिटल कोर्टासमोर हजर करण्यात आले. या कोटार्ने बँकरला जामीन मंजूर केला. त्यासाठी बँकरला त्याचे सर्व पैसे ठराविक खात्यात ट्रान्सफर करण्यास सांगितले. तसेच त्याचा पासपोर्ट जप्त केला. बँकरने त्याच्या खात्यातील सर्व पैसे ट्रान्सफर केल्यानंतर त्याला राष्ट्रीय गोपनियता कायद्याअंतर्गत ही माहिती कोणालाही न उघड करण्याची ग्वाही देण्यास सांगितले. तसेच जर त्याने ही माहिती उघड केली तर त्याच्या दोन मुली, त्यांचे पती आणि मुलांची हत्या करण्याची धमकीही दिली. गंभीर बाब म्हणजे न्यायालये जामिनाच्या अटी लावतात त्याप्रमाणे, डिजिटल कोटार्ने निवृत्त बँकरला अटी घातल्या होत्या. त्याप्रमाणे सकाळी 8 ते रात्री 8 या वेळेत दर दोन तासांनी मुंबई पोलीस अधिकाऱ्यांसमोर (म्हणजे सायबर फसवणूक करणारे) हजर राहण्यास सांगितले होते. निवृत्त बँकर त्याच्या दिल्लीतील घरात एकटाच राहतो. या प्रकारे एक महिना या बँकरला त्यांनी वास्तवात नसलेली डिजिटल अटक केली होती. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर या बँकरने दिल्ली पोलिसांत तक्रार केली. सायबर गुन्हेगारांनी या कामासाठी दोन मोबाइल नंबर वापरले होते. या नंबरसाठी सिम कार्ड कुठून खरेदी केले याचा शोध पोलीस घेत आहेत. ज्या बँक खात्यांत 23 कोटी रुपये ट्रान्सफर केले त्यांचीही चौकशी केली जात आहे. तक्रारीनंतर दिल्ली पोलिसांनी दीड कोटी रुपये गोठवले असले तरी, सायबर गुन्हेगार अनेक खात्यांमध्ये पैसे ट्रान्सफर करत असतात, हे वास्तव आहे. मुंबई पोलिस अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार, काही महिन्यांपूर्वी, 84 लाखांची सायबर फसवणूक झाली होती. ते पैसे 172 खात्यांमध्ये ट्रान्सफर केले होते. कोणत्याही तपास संस्थेला एकाच वेळी इतक्या बँक खात्यांमध्ये प्रवेश करणे किंवा इतक्या खात्यांना ब्लॉक करणे अशक्य असते. अलीकडेच, गृह मंत्रालयाने संसदेत माहिती दिली होती की 2024 मध्ये सायबर गुन्हेगारांकडून देशाला 22 हजार 845 कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. 2023 मध्ये नोंदवलेल्या 7 हजार 465 कोटी रुपयांच्या तुलनेत हे 206 टक्के जास्त होते. मुंबईतही, जानेवारी 2024 ते मार्च 2025 या 15 महिन्यांत, सायबर गुन्हेगारांनी 1 हजार 127 कोटींची लूट केली. अमेरिकेतही काही वेगळी स्थिती नाही. एफबीआयच्या इंटरनेट क्राइम कम्प्लेंट सेंटरच्या 2024 च्या वार्षिक अहवालानुसार, अमेरिकेत इंटरनेट गुन्ह्यांमुळे होणारे 16 अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त नुकसान झाले आहे.

## नवरात्रोत्सवात मुंबई पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त



■**मुंबई । प्रतिनिधी,**

उद्यापासून नवरात्रोत्सवाला सुरुवात होत आहे. संपूर्ण मुंबईत सणाची तयारी जोरात सुरू आहे. शहरभर मंडप, विद्युत रोषणाई, गरबा-दांडियाचे कार्यक्रम आणि देवीच्या मूर्तींच्या स्थापनेसाठी लोक गर्दी करत आहेत. या पार्श्वभूमीवर, मुंबई पोलिसांनी संपूर्ण शहरात कडक आणि सुस्थितीत बंदोबस्त राबवण्याची तयारी पूर्ण केली आहे. यंदा विशेषतः गदीर्चे योग्य नियंत्रण, नागरिकांची सुरक्षितता आणि शहरातील कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. नवरात्रोत्सव हा नऊ दिवस चालणार महत्वाचा सण आहे. या काळात सर्वत्र गरबा, दांडिया आणि कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक एकत्र येत असल्याने मुंबईतील सर्व पोलीस ठाण्यांना त्यांच्या हद्दीतल्या मंडळांशी आणि सामाजिक संस्था, कार्यकर्ते व स्थानिक प्रतिनिधींशी समन्वय साधण्याचे निर्देश दिले गेले आहेत. कार्यक्रम नियमानुसार वेळेत संपवणे, ध्वनिप्रदूषण टाळणे आणि सर्व सुरक्षा निर्देशांचे काटेकोर पालन करणे आयोजकांसाठी बंधनकारक करण्यात आले आहे. पोलिसांनी नवरात्र साजरी करणाऱ्या मंडळांना काही आवश्यक सुरक्षा सूचना दिल्या आहेत. यामध्ये स्वयंसेवकांची नेमणूक, गदीर्चे व्यवस्थापन, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची निगराणी, वॉच टॉवर्स उभारणे, पार्किंगसाठी स्वतंत्र जागा निश्चित करणे, अनावश्यक वस्तूंवर बंदी घालणे आणि खासगी सुरक्षारक्षकांची नियुक्ती करणे यांचा समावेश आहे.

## आजपासून नवे जीएसटी दर लागू होणार




■**मुंबई । प्रतिनिधी,**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील जीएसटीचे स्वप्न साकार जीएसटी काऊन्सिल बैठकीत पूर्ण झाले होते ज्यात सर्वसामान्यांना दिलासा म्हणून वस्तू व सेवा कर मोठी कपात झाली होती. त्याचाच पुढील अध्याय म्हणून निर्णयाची प्रत्यक्ष अंमल बजावणी परवा २२ सप्टेंबर पासून होणार आहे. त्यामुळे जीएसटी प्रणालीमध्ये मोठा बदल अपेक्षित आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली या महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या ५६ व्या जीएसटी परिषदेच्या शिफारशींनुसार सरकारने एक स रलीकृत दर रचना जाहीर केली आहे. ज्यामध्ये जीएसटी तर्कसंगतीकरण धोरण स्विकारले गेले आहे. दरम्यान अनेक कंपन्यांनी आपल्या वस्तूंत दरकपातीची अंमलबजावणी सुरू केली आहे.सोमवारपासून जीएसटी दोन-स्तरीय प्रणाली मध्ये जाईल जिथे बहुतेक वस्तू आणि सेवांवर ५% किंवा १८% कर आकारला जाईल.

**सुधारित जीएसटी कपातीची प्रमुख ठळक मुद्दे-**

पुनर्रचनाचा उद्देश व्यक्तींना, विशेषतः मध्यमवगार्ला दिलासा देणे, व्यवसायांसाठी अनुपालन सुलभ करणे आणि जीएसटी अंतर्गत व्यापार सुलभ असेल.

५%, १२%, १८% आणि २८% ची विद्यमान चार-स्तरीय रचना बंद केली जाईल. त्याऐवजी केवळ ५%,१८% रचना असेल.

अति-लक्झरी वस्तूंवर ४०% जीएसटीचा मोठा कर आकारला जाईल.

तंबाखू आणि संबंधित उत्पादने २८% अधिक उपकर श्रेणीत राहतील.

२०१७ मध्ये सुरू झालेला जीएसटी आतापर्यंत चार प्रमुख स्लॅबसह कार्यरत आहे, ज्यामध्ये लक्झरी आणि पाप वस्तूंवर वर भरपाई उपकर देखील समाविष्ट आहे. येणाऱ्या बदलांमुळे अप्रत्यक्ष कर चौकटीत मध्ये त्याच्या सुरुवातीपासून आतापर्यंत सर्वात महत्वाचा परिवर्तनवादी निर्णय जीएसटी २.० हा मानला जातो आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# प्रगतीसाठी आरक्षण हा एकमेव उपाय नाही




आरक्षण हेच समाजविकासाचे एकमेव साधन आहे आणि आरक्षणामुळे जादूची कांडी फिरवल्यासारखी स्थिती पालटेल हा भ्रम आहे. आरक्षणामुळे केवळ संधी उपलब्ध होते, संधीचे विकासात रुपांतर करण्यासाठी आवश्यक प्रेरणेचा शोध मराठा समुदायाने घेणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वात पहिल्यांदा जातीय अहंकारातून मराठा समुदायाने बाहेर पडणे गरजेचे आहे. या अहंकारातून वस्तुस्थिती नाकारण्याकडे कल वाढतो. जातीय अहंकारातून सामाजिक प्रतिष्ठेचा भ्रम वाढीस लागतो. त्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण, रोजगार निर्मिती आणि विकासाच्या विविध संधी शोधण्याची गरज आहे. आरक्षण हेच समाजविकासाचे एकमेव साधन आहे आणि आरक्षणामुळे जादूची कांडी फिरवल्यासारखी स्थिती पालटेल हा भ्रम आहे. आरक्षणामुळे केवळ संधी उपलब्ध होते, संधीचे विकासात रुपांतर करण्यासाठी आवश्यक प्रेरणेचा शोध मराठा समुदायाने घेणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वात पहिल्यांदा जातीय अहंकारातून मराठा समुदायाने बाहेर पडणे गरजेचे आहे. या अहंकारातून वस्तुस्थिती नाकारण्याकडे कल वाढतो. जातीय अहंकारातून सामाजिक प्रतिष्ठेचा भ्रम वाढीस लागतो. त्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण, रोजगार निर्मिती आणि विकासाच्या विविध संधी शोधण्याची गरज आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आर्थिक मुद्द्यावरील मागास वगार्चे आरक्षण आधीपासूनच लागू आहे. केंद्र सरकारने ईडब्ल्यूएसचे आरक्षण २० टक्के लागू केले आहे, जे आर्थिक निकषांवर आधारित आहे. या आर्थिक निकषाच्या आरक्षणातील तरतुदी आणि त्याच्या अंमलबजावणीतील अडचणी दूर करणे, त्रुटी कमी करण्याची गरज आहे. ईडब्ल्यूएसच्या आरक्षणामुळे आरक्षणाचा टक्का वाढला असून त्यात अधिकची भर घातल्यास हे संविधानाच्या सामाजिकदृष्ट्या मागासलेपणाच्या तत्वाविरोधात जाऊ शकते, हा मोठा अडसर त्यामागे आहे. मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गात असल्याचे सिद्ध करणे ही मोठी कसोटी आहे. त्यासाठी समाजातील सर्वच घटकांचे एकमत होणे आणि जातीय अहंकाराचा विषय बाजूला ठेवण्याची गरज आहे. गायकवाड आयोगाच्या अहवालानुसार मराठा समुदाय आर्थिकदृष्ट्या मागासवर्गात एकवेळ समाविष्ट होऊ शकेल, मात्र सामाजिकदृष्ट्या मागासवर्गात असल्याचे न्यायालयासमोर सिद्ध करावे लागेल. सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण रद्द केल्याची कारणे स्पष्ट करताना हा मुद्दा प्रकषार्ने लक्षात घेतला आहे. ५० टक्क्यांपुढे आरक्षण वाढवण्यासाठीचे राज्य सरकारने सादर केलेले पुरावे आणि अहवाल अपुरे आणि अशास्त्रीय असल्याचे स्पष्ट झाले, केवळ सरकारवरील दबावामुळे ही कार्यवाही सरकारकडून झाल्याचे स्पष्ट व्हावे. यामुळे सरकारने विशेष स्वतंत्र प्रवर्ग तयार करण्याचा मार्ग अवलंबला होता तसेच आर्थिकदृष्ट्या मागासवर्गाच्या कक्षेत मराठा समुदायाला बसवण्यासाठीचा प्रयत्न झाला. यात सरकारच्या अखत्यारित सवलती देण्याचा प्रयत्न झाला. मात्र यातील निकषही न्यायालयीन आणि घटनात्मक मयार्देत बसवणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी महाराष्ट्र विधानसभेत मागील वर्षी फेब्रुवारी महिन्यात एसईबीसी विधेयक मंजूर करण्यात आले. ज्यामुळे मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी नोर्कया या दोन्हीत दहा टक्के आरक्षण देण्यात आले आहे. मात्र त्यात क्रिमीलेअरची अट असल्याने हे सरसकट आरक्षण नाही. कुणबी नसलेला मराठा समुदायही या नवीन कायद्यांतर्गत आरक्षणाचा लाभ घेऊ शकतो. परंतु या आरक्षणाविरोधातही विविध आक्षेप न्यायालयात दाखल करण्यात आले, त्यासाठी त्रिसदस्यीय बेंचची स्थापना करण्यात आली. सध्या, त्या कायद्याअंतर्गत दहा टक्के आरक्षण वर्ष २०२५ साठी अंतरिम आदेशाखाली लागू आहे, म्हणजे अंतिम निर्णय येईपर्यंत हे कायम राहणार आहे. याविषयी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाला अडसर ठरू शकणार नाही यासाठी ५० टक्क्यांवर आरक्षण जाण्यासाठी आवश्यक पावले आणि धोरण आखावे लागेल. आरक्षणामुळे गरजू मराठा विद्यार्थ्यांना मेडिकल, इंजिनीअरिंग, कायदा, विज्ञान अशा अभ्यासक्रमासाठी लाभ होईल. त्यामुळे अल्प उत्पन्न गटातील मराठ्यांना सरकारी नोकरीत प्रवेश सुकर होईल. मात्र हे होत असताना आरक्षण हेच समाजविकासाचे एकमेव साधन आहे आणि आरक्षणामुळे जादूची कांडी फिरवल्यासारखी स्थिती पालटेल हा भ्रम आहे. आरक्षणामुळे केवळ संधी उपलब्ध होते, संधीचे विकासात रुपांतर करण्यासाठी आवश्यक प्रेरणेचा शोध मराठा समुदायाने घेणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वात पहिल्यांदा जातीय अहंकारातून मराठा समुदायाने बाहेर पडणे गरजेचे आहे. या अहंकारातून वस्तुस्थिती नाकारण्याकडे कल वाढतो. जातीय अहंकारातून सामाजिक प्रतिष्ठेचा भ्रम वाढीस लागतो. त्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण, रोजगार निर्मिती आणि विकासाच्या विविध संधी शोधण्याची गरज आहे. परंपरागत अभ्यासक्रमांपेक्षा तंत्रज्ञानाधारित अभ्यासक्रमांमध्ये रोजगाराला वाव आहे. सत्ता, मालमत्तेवर वर्चस्व असलेले मूठभर मराठे म्हणजे संपूर्ण मराठा समाज नाही, किंवा असे घटक संपूर्ण समुदायाचे प्रतिनिधीही नाहीत. आजपर्यंत महाराष्ट्राचा इतिहास पाहता अशा सधन मराठा समुदायाकडून गरजू मराठ्यांचा केवळ राजकीय वापरच झाला. हा वापर करताना जातीय अस्मितेचा उपयोग राजकीय मंडळींकडून वारंवार करण्यात आला आहे. या अहंकारी अस्मितेलाच अभिमान समजून झालेली ऐतिहासिक चूक मराठा समुदायातील नव्या दमाच्या तरुणांनी वेळीच समजून घ्यायला हवी. शिक्षण मग ते कोणत्याही परिस्थितीत कुठलाही त्रास झाला आणि कितीही आव्हाने आली तरी घ्यायलाच हवे, ही जाणीव मराठा तरुणांमध्ये रुजायला हवी. इतिहासातील वर्चस्ववादी मानसिकतेचा वेळीच त्याग करणे मराठा समुदायासाठी आवश्यक आहे. त्यासोबतच नव्या जगाची नवी आव्हाने ओळखायला हवीत. येत्या काळात सरकारी संस्थांचे खासगीकरण केले जाणार आहे. त्यामुळे सरकारी नोर्कया कमी होणार आहेत, हे लक्षात घ्यायला हवे. आरक्षणाच्या मुद्द्यावर होणारी तुलना करताना अनुसूचित जातींमधील विकासाचे दाखले देण्याचे प्रमाण वाढले आहे, परंतु अनुसूचित जातीमधील विकासाची प्रेरणा ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांनी केलेल्या कार्याच्या दृष्टीने पाहायला हवी. ह्यशिका, संघटित व्हा आणि संघर्ष कराह्ण हा बाबासाहेबांचा संदेश आत्मसात करणे गरजेचे आहे. त्यातील पहिली पायरी ही शिक्षणाचीच आहे. केवळ नोकरी किंवा आर्थिक स्थैर्य मिळवण्यासाठी शिक्षण त्यासाठी आरक्षणाची गरज, अशी मांडणी चुकीची आहे. शिक्षणामुळे व्यावहारीक जगात चांगले वाईट आणि आपल्यासाठी हिताचे तसेच अहिताचे घटक ओळखता येतात, शिक्षणामुळे अहंकाराची जागा विवेकाने घेतली जाते. आरक्षणाची मागणी करताना शिक्षणाचे हे मूलभूत तत्व ओळखायला हवे. शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक समानता हे पैलू आरक्षणातून साध्य झाल्यास त्याचा उपयोग होईल. अनुसूचित जातींमधील विकासाची कारणे शोधताना तत्कालीन परिस्थितीचाही विचार होणे गरचेचे आहे. राज्यघटना अस्तित्वात आल्यानंतर मागील सत्तर वषार्पूवीर्ची स्थिती आणि आजची वस्तुस्थिती यात कमालीचा फरक आहे. लोकशाहीच्या स्थापनेनंतर प्रशासन चालवण्यासाठी अनुशेष भरताना मोठ्या प्रमाणात अनुसूचित जातींना संधी मिळाली. त्यात पूर्वाश्रमीच्या महार आणि धर्मांतरानंतर बौद्ध झालेल्या आंबेडकरी प्रेरणेच्या समुदायाचे उदाहरण महत्त्वाचे आहे. डॉ. आंबेडकर यांच्या प्रेरणेने समुदायाने परंपरागत कामे सोडली होती. त्यातच या समुदायांकडे मालमत्तेचे अधिकार नगण्य होते. त्यामुळे उदरनिवार्साठी इतर मार्ग निवडण्याशिवाय कुठलाही पर्याय नव्हता. परिणामी सरकारी नोकर भरतीत आणि शिक्षणाचे महत्त्व पटल्याने हा समुदाय इतर मागास घटकांच्या तुलनेत जास्तीत जास्त अधिकारपदापर्यंत पोहचू शकला.

# जलदगती महामार्ग अनेकांच्या आयुष्याला ब्रेक लावतोय



उद्योगांना बळ मिळावे तसेच प्रवाशांचा प्रवास सुखकर आणि जलदगतीने व्हावा म्हणून तयार केलेला मुंबई-अहमदाबाद हा राष्ट्रीय महामार्ग, प्रवासाचा मार्ग आहे की मृत्यूचा मार्ग असा प्रश्न आता निर्माण झालेला आहे. या महामार्गावर होर्णाया वाहतूक कोंडीमध्ये गेल्या दीड महिन्यांत दोन निष्पाप जीवांचा बळी गेला आहे. 30 जुलैला या महामार्गावरील वाहतूक कोंडीत ॲम्ब्युलन्स फसल्याने पालघर तालुक्यातील सफाळे येथील छाया पुरव या 49 वर्षीय महिला रुग्णाचा मृत्यू झाला होता. या घटनेला उलटून दीड महिना होत नाही, तोच दोन दिवसांपूर्वीच पुन्हा या वाहतूक कोंडीमुळे एका चिमुकल्याला आपला जीव गमवावा लागला.

साधारण डिसेंबरचा महिना. साल 1991. पालघर जिल्ह्यातील मेंढवण या ठिकाणी रसायन घेऊन जाणार टँकर मुंबई-अहमदाबाद महामार्गावर उलटला. उत्सुकतेपोटी आणि काही तरी उपयोगी मिळेल या आशेपोटी गावातील ग्रामस्थ या ठिकाणी मोठ्या संख्येने पोहोचले. परंतु,काही वेळातच या वेळी कोणाच्या ध्यानीमनीही नव्हता असा अपघात झाला. पलटी झालेल्या टँकरने अचानक पेट घेतला. मोठा स्फोट झाला. या स्फोटात जवळपास 106 ग्रामस्थ जळून खाक झाले. त्यावेळच्या प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार,ज्यांचा मृत्यू झाला होता,त्यांची ओळख पटवणे देखील कठीण जात होते. मेंढवण गावाला हा सर्वात मोठा धक्का होता.

गावातील 100 हून अधिक ग्रामस्थांवर असा काळाने घाला घालणे, गावाची मोठी हानी होती. जवळपास गावातील 3 पिढ्यांवर या अपघाताचा परिणाम झाला. ज्या जागी हा अपघात झाला, तो मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग म्हणजेच एनएच 48 हा त्यावेळी आताच्या तुलनेत एक छोटा रस्ता होता. त्यानंतर या मागार्चे 2002 साली चौपदरीकरण आणि त्यानंतर सहापदरीकण झाले. परंतु,अगदी छोटा रस्ता असल्यापासून चौपदरीकरण आणि सहापदरीकरण होईपर्यंत या महामागार्ने ह्यमहाह्णसमस्या पाहिलेल्या आहेत. अनेकांचा जीव जाताना पाहिला आहे. मग महामार्गावर ट्राफिक असू दे नाहीतर रस्त्यावर अगदी कमी वाहने असू देत, जीवनाचा जास्तीत जास्त वेग गाठण्यासाठी निर्माण केलेल्या या महामार्गावर कित्येक जणांच्या आयुष्याच्या प्रवासाला कायमचा पूर्णविराम लागला आहे. तर काही जण विकलांग झालेले आहेत.

उद्योगांना बळ मिळावे तसेच प्रवाशांचा प्रवास सुखकर आणि जलदगतीने व्हावा म्हणून तयार केलेला मुंबई-अहमदाबाद हा राष्ट्रीय महामार्ग, प्रवासाचा मार्ग आहे की मृत्यूचा मार्ग असा प्रश्न आता निर्माण झालेला आहे. या महामार्गावर होर्णाया वाहतूक कोंडीमध्ये गेल्या दीड महिन्यांत दोन निष्पाप जीवांचा बळी गेला आहे. 30 जुलैला या महामार्गावरील वाहतूक कोंडीत ॲम्ब्युलन्स फसल्याने पालघर तालुक्यातील सफाळे येथील छाया पुरव या 49 वर्षीय महिला रुग्णाचा मृत्यू झाला होता. या घटनेला उलटून दीड महिना होत नाही, तोच दोन दिवसांपूर्वीच पुन्हा या वाहतूक कोंडीमुळे एका चिमुकल्याला आपला जीव गमवावा लागला.

वसईतील पेल्हार येथे गुरुवारी (ता. 18 सप्टेंबर) 16 महिन्यांचा रियान शेख हा तो राहात असलेल्या इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून खाली पडला. या घटनेत त्याच्या पोटाला गंभीर दुखापत झाली. ज्यानंतर तातडीने त्याला जवळच्या गॅलेक्सी रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी डॉक्टरांनी त्याच्यावर प्राथमिक उपचार करून त्याला मोठ्या रुग्णालयात हलवण्याचा सल्ला दिला. त्यानुसार, गुरुवारी दुपारी सुमारे 2.30 वाजता रुग्णवाहिकेद्वारे त्याला उपचारासाठी मुंबईकडे रवाना करण्यात आले. मात्र, त्याचदिवशी मुंबई-अहमदाबाद महामार्गावर सकाळपासूनच वाहतुकीची प्रचंड कोंडी निर्माण झाली होती. या वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका तब्बल पाच तास अडकून राहिली आणि रुग्णालयात पोहोचण्याआधीच रियानची प्रकृती ढासळू लागली.

वाहतूक कोंडीत अडकलेली रुग्णवाहिका पुढे जाऊ शकत नसल्याने, अखेर रियानच्या कुटुंबीयांनी त्याला जवळच्याच ससूनवघर गावातील एका लहान रुग्णालयात नेले. मात्र, तेथील डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. गुजरात आणि महाराष्ट्र या दोन महत्वाच्या राज्यांना जोडर्णाया मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर वाहने बंद पडणे, खड्ड्यांची समस्या आणि अवजड वाहने बंदीचा नियोजन शून्य कारभार अशा विविध कारणांमुळे प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. कधी कधी जवळपास दहातासांहून अधिक काळ वाहतूक कोंडी कायम असते. त्यामुळे वसोर्वा पूल ते वसई फाटा या दरम्यान वाहनांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या असतात. वसई पूर्वेच्या भागातून मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. पावसाळा सुरू झाल्यापासून या महामार्गावर विविध समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. महामार्गावर विविध ठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहतुकीचा वेग फारच मंदावला आहे. तर दुसरीकडे अवजड वाहने ही मध्येच बंद पडत असल्याने वाहतूक कोंडीत अधिकच भर पडते. त्यातच ठाण्याच्या भागात अवजड वाहनांना बंदी घातली आहे. मात्र याचे योग्य ते नियोजन नसल्याने ठाणे आणि मुंबईच्या दिशेने जार्णाया वाहिनीवर प्रचंड वाहतूक कोंडी होते. वसोर्वा पूल ते नायगाव फाटा, वसई फाटा या दरम्यान वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. त्यामुळे याचा मोठा फटका प्रवाशांना बसतो.

राष्ट्रीय महामार्गावर निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीचा मोठा फटका रुग्णवाहिकांना बसतो. विविध ठिकाणच्या भागात रुग्णवाहिका या कोंडीत अडकून पडल्याचे दिसून येते. त्यात काहींना आपला जीवदेखील गमवावा लागतो. याशिवाय अपघाताच्या अनेक घटना या महामार्गावर आतापर्यंत घडल्या आहेत. याआधी मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर 4 सप्टेंबर 2022 रोजी पहाटे 3 वाजण्याच्या सुमारास टाटा समुहाचे माजी अध्यक्ष सायरस मिस्त्री यांच्या गाडीचा भीषण अपघात झाला होता. या अपघातात सायरस मिस्त्री आणि त्यांचे सहकारी जहांगीर पंडोल यांचा जागीच मृत्यू झाला होता. तर कार चालक अनहिता पंडोल आणि त्यांचे पती डेरिअस पंडोल गंभीर जखमी झाले होते. सुर्या नदीच्या पहिल्या डिव्हायडरला गाडी आदळून हा अपघात झाला. गेल्या अनेक वर्षांत मुंबई-अहमदाबाद महामार्गावर अशा अनेक जणांनी अपघातात आपला प्राण गमावला आहे. एकीकडे रस्ता सुरक्षेचा अभाव तर दुसरीकडे वाहतूक कोंडी या दुहेरी समस्येत येथून प्रवास करणारे प्रवासी अडकत आहेत. अपघातांची वाढती संख्या आणि वाहतूक कोंडीमुळे मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग प्रवास करर्णायांसाठी अधिकाधिक धोकादायक ठरत चालला आहे. मुंबई-अहमदाबाद महामागार्चे व्हाईट टॉपिंगचे काम पूर्ण झाले आहे, परंतु निकृष्ट दर्जाच्या कामामुळे अपघातांचे प्रमाण वाढल्याचा आरोप स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांनी केला आहे. महामार्गावरील अपघातांच्या संख्येबाबत मनोर पोलीस ठाण्यातील आकडेवारीनुसार गेल्या वर्षी (जानेवारी ते डिसेंबर 2024) मध्ये महामार्गावर छोटे-मोठे मिळून 71 अपघात घडले होते.

अपघातांमध्ये 31 जण गंभीर जखमी तर 23 जणांचा मृत्यू झाला होता. 2025 साली जानेवारी ते ऑगस्टपर्यंतच्या आठ महिन्यांच्या कालावधीत अपघातांचा आकडा 80 पर्यंत पोहोचला आहे. अपघातांमध्ये किरकोळ तसेच गंभीर जखमींचा आकडा 48 तर मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या 42 आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी अपघात आणि मृत्यूंच्या प्रमाणात वाढ झाली आहे. महामार्गावरील अच्छाड ते घोडबंदरपर्यंतच्या 121 किलोमीटर लांबीच्या महामागार्चे व्हाईट टॉपिंगच्या कामातील अनेक त्रुटी तसेच त्रुटी असलेल्या डिझाईन आणि वाहतुकीवरील नियंत्रणाचा अभाव यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचे समोर आले आहेत.

याआधी मुंबई-अहमदाबाद महामार्गावर व्हाईट टॉपिंगच्या कामामुळे अनेक अपघात झाले आहेत, ज्यात एका अपघातात एका कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला. या अपघातांना रस्त्यावर दिसणारे रॅम्प (दगड), कमी दिसणारे दिवे आणि खराब रस्ता ही कारणे आहेत, असे प्रत्यक्षदर्शी आणि वाहतूकतज्ज्ञ म्हणतात. व्हाईट टॉपिंगच्या कामात रस्ता एकसारखा नसतो आणि अनेक ठिकाणी उंचीमध्ये फरक असतो, ज्यामुळे गाड्यांना धक्के लागतात आणि अपघात होतात. एका आकडेवारीनुसार, गेल्या एका दशकात (२०१४ ते २०२४)या कालावधीत भारतात सुमारे १,०१,९०० किमी राष्ट्रीय महामार्ग बांधले गेले आहेत, ज्यामुळे एकूण राष्ट्रीय महामार्गांच्या जाळ्यामध्ये सुमारे ६० टक्के वाढ झाली आहे. या काळात, महामार्ग बांधणीचा सरासरी वेग वाढून दिवसाला सुमारे २६.३ किमी झाला आहे. या महामार्गांच्या बांधकामावर कोट्यवधी रूपयांचा खर्च झाला आहे. परंतु, देशातील व्यापार आणि नागरिकांचा प्रवास जलद आणि सुखकर होण्यासाठी उभारण्यात आलेले मुंबई-अहमदाबादसारखे महामार्ग प्रवाशांसाठी मोठी समस्या ठरत आहे.

गेल्या काही वर्षांपासून वाहनांची संख्या वेगाने वाढत आहे. ज्याचे मुख्य कारण वाढती लोकसंख्या, शहरीकरण, वाढते उत्पन्न आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अभाव हे आहे. या वाढीमुळे हवेचे प्रदूषण, वाहतूक कोंडी आणि अपघातांमध्ये वाढ होत आहेत. आकडेवारीनुसार 2022 मध्ये ३५ कोटींहून अधिक वाहने नोंदवली गेली होती. पुढे 2050 पर्यंत वाहनांची संख्या दुप्पट होण्याचा अंदाज आहे, ज्यामुळे वाहनांच्या संख्येत मोठी वाढ होईल. परंतु, ही मोठ्या संख्येतील वाहने जेव्हा रस्त्यावरून धावतात, तेव्हा त्यांचे नियोजन करण्याची क्षमता आपल्या महामार्ग व्यवस्थेमध्ये आहे का? तर मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील रस्ता सुरक्षेअभावी होणारे अपघात आणि वाहतूक कोंडीपायी जाणारे जीव यांच्याकडे पाहून उत्तर नाही असेच येणार आहे. देशातील केंद्र सरकारकडून रस्ते बांधण्यासाठी पैशांची कमतरता नसल्याचे सांगण्यात येत आहे. परंतु,असे महामार्ग बांधताना त्या मार्गावरून धावर्णाया वाहनांचे नियोजन करणे, त्यांची सुरक्षा करणे तेवढेच महत्वाचे आहे. पुढील काळात अशा अपघातांना आळा घालण्यासाठी अधिक चांगले नियोजन, योग्य रस्ते सुरक्षा आणि अपघाती क्षेत्रांमध्ये योग्य चिन्हांकन करण्याची गरज आहे. तरच जलद प्रवास होण्यासाठी उभारलेले हे महामार्ग देशातील नागरिकांचा सुखकर होऊ शकतील.

# सौदीही निसटला?



पाकिस्तानचा नुसता उल्लेख झाला, तरी भारतीय मन सावध होतं. पाकिस्तान भारताची थेट कुरापत काढू शकत नाही, पण भारतावर दबाव टाकण्यासाठी तो कुणाच्याही हातचं बाहुलं बनायला कधीही तत्पर असतो, हे सारं जग जाणतं. प्रत्येक भारतीय त्यामुळेच पाकिस्तानबाबत सदैव सावध असतो. सौदी अरेबिया आणि पाकिस्तानमध्ये दोन दिवसांपूर्वी झालेल्या संरक्षण कराराने जगाचं लक्ष किती वेधलं गेलं माहीत नाही, पण भारतातल्या प्रसिद्धी माध्यमांनी आणि धोरणकर्त्यांनी त्याची गंभीर दखल घेतली, हे निश्चित. आशियाई राजकारणात भारत आणि चीन ही दोन शक्ती केंद्र आहेत. काही वर्षांपर्यंत आपल्या सीमा शांत राखण्यात आणि शेजारच्या छोट्या देशांना धाकात ठेवण्यात भारत यशस्वी होता. अपवाद पाकिस्तान आणि मोठ्या चीनचा. पण, गेल्या काही वर्षांत ही परिस्थिती बदलली आहे. पाकिस्तानच्या बाजूने होणाऱ्या अतिरेकी कारवायांना उत्तर देताना भारताच्या बाजूने शेजारी देश उभे राहत नाहीत, हे भारताच्या गेल्या दोन्ही कारवायांच्या वेळी दिसून आलं आहे. श्रीलंका, बांगलादेश आणि नेपाळ या तिन्ही शेजारी राष्ट्रांत जनउद्रेक होऊन सरकारं उलथवली गेली आहेत. तिथल्या पदच्युत राज्यकर्त्यांना भारतानेच आश्रय दिला आहे! दक्षिण आशियातील या घडामोडींमध्ये राजकीयदृष्ट्या योग्य भूमिका घेण्याची भारताची तारेवरची कसरत सुरू असतानाच पाकिस्तान आणि सौदी अरेबियातील संरक्षण कराराने पश्चिम आशियात भारतासमोर नवं आव्हान उभं राहिलं आहे. भारत आणि सौदी अरेबियाचे संबंध आतापर्यंत उत्तमच होते. ऊर्जा, व्यापार, परराष्ट्र धोरण, अगदी संरक्षणविषयक बाबींतही दोन्ही देशांत चांगला समन्वय होता. पाकिस्तानबरोबर संरक्षण करार केल्याने आणि त्या करारात 'दोन्हींपैकी कोणत्याही एका देशावर आक्रमण किंवा संरक्षणविषयक आगळीक घडल्यास तो दोन्ही देशांवरील हल्ला समजून उत्तर दिले जाईल' अशी भाषा वापरली गेल्याने भारतासाठी हा करार चिंतेचा ठरला आहे.

सौदी अरेबिया किंवा ज्यांना 'गल्फ को-ऑपरेटिव्ह कंट्रीज' (जेसीसी देश) म्हटलं जातं, ते बाहरीन, कुवेत, ओमान, कतार, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती हे देश म्हणून खूपच छोटे आहेत. तेलाच्या खाणी आणि त्यातून त्यांनी काही ठिकाणी उभारलेली मुक्त व्यापार केंद्र हीच त्यांची ताकद आहे. स्वतःच्या रक्षणासाठी स्वबळावर सैन्य उभारण्याची किंवा सैन्य बाळगण्याची त्यांची क्षमता नाही.

त्यांच्यासाठी ही जबाबदारी आतापर्यंत अमेरिकाच घेत होती. पण, अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हटवादी आणि विक्षिप्त भूमिकांमुळे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात आमूलाग्र बदल होत असून त्याचे पडसाद जगभर उमटत आहेत. याच महिन्यात, ९ सप्टेंबर रोजी इस्त्रायलने कतारची राजधानी दोह्यावर लष्करी हल्ला केला. हा हल्ला केवळ कतारवर असला, तरी संपूर्ण पश्चिम आशियाने तो आपल्यावरचा हल्ला मानला. या हल्ल्यावरून अमेरिका आपल्या बाजूने उभी राहील आणि इस्त्रायलला सुनावेल, अशी जीसीसी देशांची अपेक्षा होती. पण, घडलं भलतंच. अमेरिकेचे संरक्षण सचिव मार्को रुबियो या हल्ल्यानंतर जेरुसलेमला गेले आणि त्यांनी या हल्ल्याबद्दल नापसंती दाखवण्याऐवजी उलट इस्त्रायलला आपल्या धोरणानुसार वागायचं स्वातंत्र्य आहे, असं प्रशस्तीपत्र दिलं! अमेरिकेच्या या पावित्र्याने पश्चिम आशियातले सगळे अरब देश बिथरले, त्यातूनच सौदीने पाकिस्तानचा हात धरल्याचं चित्र उभं करण्यात आलं आहे. मुळात पाकिस्तानच संरक्षण सामग्रीसाठी अमेरिकेवर अवलंबून असतो. त्याचं सैन्यबळही जगात १२ व्या क्रमांकाचं आहे. तो आपलं संरक्षण करू शकत नाही, हे सौदीला कळत नाही? पण, पाकिस्तान हे मुस्लीम राष्ट्रातलं अण्वस्त्रसज्ज राष्ट्र आहे आणि त्यांची सारी खुमखुमी अमेरिकेच्या (प्रसंगी चीनच्याही) जीवावर असते, हे त्यांना माहीत आहे.


अमेरिकेला सध्या इस्त्रायलला उघड पाठिंबा द्यायचा आहे, तर आपण पाकिस्तानचा हात धरून दुसऱ्या बाजूला उभं राहावं, एवढीच सौदीची यामागची भूमिका आहे. 'हा करार करताना भारताचे हितसंबंध किंवा भारताबरोबरचे आमचे मधुर संबंध विस्कटवण्याचा आमचा अजिबात हेतू नाही. आम्हाला भीती इस्त्रायल, इराण, तालिबानी अफगाणिस्तान आणि येमेनची आहे. त्यांच्यासाठी हा करार आहे' असा खुलासा सौदी अरेबियाच्या बाजूने करण्यात आला आहे. 'दुसऱ्या महायुद्धापासून; विशेषतः शीतयुद्धाच्या काळातही आमचा पाकिस्तानबरोबर तसा समझोता होताच. नव्या संदर्भात आम्ही तो कराराच्या रूपात, लेखी केला एवढंच' असंही त्यांचं म्हणणं आहे. गेल्या दशकभरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सौदी अरेबियाला तीनदा भेट दिली. पाकिस्तानबरोबरच्या या करारात अण्वस्त्र वापराचा किंवा अण्वस्त्र मदतीचा कुठेही उल्लेख नाही, असं स्पष्टीकरणही सौदी देतो आहे. हे स्पष्टीकरण ठीक असलं, तरी भारत त्यावर आंधळा विश्वास ठेवू शकत नाही. कारण, हा करार करण्यात पाकिस्तानचे लष्कर प्रमुख आसिफ मुनीर यांचाच हात आहे, हा करार होण्यापूर्वी अगदी अलीकडे त्यांचे दोन अमेरिका दौरे झाले आहेत, याकडे भारत दुर्लक्ष करू शकत नाही. पाकिस्तान ट्रम्प यांचा किती लाडका आहे, हे गेल्या काही महिन्यांत उघड झालं आहे. गरज पडेल तेव्हां त्याला बळ द्यायला चीन आहेच. 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळी पाकिस्तानच्या मदतीला अचानक तुर्कस्तान उभा राहिला होता. आता सौदीबरोबर तर त्यांनी उघड करारच केला आहे. 'ट्रम्प टॅरिफ'ला शह देण्यासाठी भारत चीनच्या अधिक जवळ सरकलाच, तर संपूर्ण आशिया खंडातल्या परराष्ट्र संबंधांची फेरमांडणी आपण करू शकतो, हा इशारा ट्रम्प यांनी याद्वारे दिला आहे, असं मानायला जागा आहे. भारताला त्याची गंभीर दखल घ्यावीच लागेल.

# देवीची रूपे:नव दुर्गा !!

नवरात्रीमध्ये देवीच्या नऊ विविध रूपांची आराधना होते, ज्यांना त्यांच्या वैशिष्ट्यांमुळे नव दुर्गा म्हणून संबोधतात.

**शैलपुत्री**


पहिले रूप आहे-शैलपुत्री.



शैल म्हणजे पाषाण आणि पुत्री म्हणजे कन्या,मुलगी.देवीच्या या रुपाची आराधना केल्याने आपल्यामध्ये पाषाणाप्रमाणे अढळ प्रतिबद्धता येते.भटकणारे मन देवीच्या या रूपाच्या स्मरण मात्रे खंबीर,निडर आणि शांत होण्यास मदत होते.

**ब्रह्मचारिणी**

ब्रम्हचर्यामुळे सामर्थ्य प्राप्त




होते.ब्रम्हचर्याला एक विशिष्ट अर्थ देखील आहे , आपले अस्तित्व अनंत आहे याची जाणीव सदोदित ठेवणे,आपण म्हणजे निव्वळ शरीर नाही तर आपण ज्योती स्वरूप आहे या सजगतेसह जीवन जगत असाल तेंव्हा तुम्ही ब्रम्हचर्यात असता. जितके तुम्ही शरीरापासून अलिप्त व्हाल तितके तुम्ही आनंदी व्हाल.जितके तुम्ही अनंत चेतनेला अनुभवाल तितके तुम्ही तणावमुक्त व्हाल तितके तुम्हाला शरीराचे जडत्व कमी जाणवेल-हे ब्रम्हचर्य होय. आपण देवीच्या या रुपाची आराधना करतो तेंव्हा आपल्या मध्ये ब्रम्हचर्याचे गुण जागृत होऊ लागतात.आणि आपली चेतना अनंताचा अनुभव घेऊ लागते, जो



आपला मूळ स्वभाव आहे.आणि जेंव्हा आपण आपला मूळ स्वभाव जाणतो तेंव्हाच आपण शूर, निडर, पराक्रमी आणि सामर्थ्यशाली बनतो.

**चन्द्रघंटा**

नवरात्रीच्या तिसऱ्या दिवशी देवीच्या चंद्रघंटा या रुपाची आराधना केली जाते.या रुपामध्ये देवीला चंद्राच्या आकाराच्या घंटांनी युक्त दागिने परिधान करतात.चंद्राचा संबंध मानवी मनाशी आहे आणि घंटेचा ध्वनी मनाला त्वरित वर्तमान क्षणात घेऊन येते.चंद्राच्या



कलांप्रमाणे मन देखील सतत आकुंचित प्रसारित होत असते. देवीच्या या रूपाच्या नामोच्चार मात्रे आपले मन सजग होऊन आपल्या नियंत्रणात येते. जेंव्हा सजगता आणि खंबीरपणा हे गुण वाढू लागतात तेंव्हा आपले मन,आपले व्यक्तिमत्व आकर्षक बनते. चंद्रघंटा ही मनाच्या या आकर्षकतेचे प्रतिक आहे.

**कूष्माण्डा**

कुष्मांड म्हणजे कोहळा. कोहळ्यात खुप बिया असतात आणि प्रत्येक बी मध्ये अनंत कोहळे निर्माण करण्याची क्षमता असते.हे पुनरुत्पादनाचे, निर्मितीचे आणि अनंत अस्तित्वाचे निदर्शक आहे.हे विश्वच कोहळ्याप्रमाणे आहे.कुश्मांडाप्रमाणेच देवीमध्ये समस्त विश्व सामावले आहे. ही देवीच आपल्याला निर्मितीची ऊर्जा देत असते.

**स्कंदमाता**

स्कंदमाता हे

कार्तिकेयाची माता आहे. बाल कार्तिकेयासह सिंहावर आरूढ असे तिचे रूप आहे. हे शौर्य आणि करुणेचे द्योतक आहे.सिंह शौर्याचे द्योतक आहे तर देवी साक्षात करुणेची मूर्ती आहे.

स्कंद म्हणजे तज्ञ,निष्णात. सामान्यपणे जे तज्ञ, प्रविण असतात ते उद्धट असतात. पण येथे



निरागसपणा वाढवणारा निष्णातपणा आहे. देवीच्या या रुपाची आराधना केल्याने कौशल्यासह निरागसपणा आणि शौर्यासह करुणा हे गुण वाढीस लागतात.


**कात्यायनी**



देवीचे मातृत्वाचे वैशिष्ट्य दर्शवणारे हे रूप आहे जिच्यामध्ये संगोपनाचे आणि निगा राखण्याचे गुण आहेत. कुमारिका चांगल्या वर प्राप्तीसाठी हिची आराधना करतात.विवाह म्हणजे संरक्षण, वचनबद्धता, सहजीवन आणि आपलेपणा. हि देवी नातेसंबंधामध्ये गरजेच्या या उच्च गुणांची प्रतिक आहे. आत्म्याशी एकरूप होणे हा सच्चा नातेसंबंध होय.

**कालरात्रि**

काल म्हणजे वेळ, समय. काळामध्ये या विश्वामधील सारे काही सामावले आहे आणि काल सवार्चा साक्षी आहे. रात्री म्हणजे गाढ विश्रांती,शारीरिक, मानसिक



आणि आत्म्याची गाढ विश्रांती. विश्रांती शिवाय आपण ताजेतवाने होऊ शकतो कां? कालरात्री म्हणजे पुन्हा कार्यक्षम होण्यासाठी मिळवलेली विश्रांती.

**महागौरी**

गौर म्हणजे गोरा, सफेद. सफेद रंग शुद्धतेचे प्रतिक आहे. शुद्धता निरागसतेमधून येते.महागौरी म्हणजे



विद्वत्ता आणि निरागसता यांचा मिलाफ.महागौरीच्या आराधनेने ती आपल्याला जीवनाबाबतचे उच्च ज्ञान प्रदान करते.

**सिद्धिदात्री**

जी सर्व सिद्धी देते ती सिद्धीधात्री.जे हवे आहे,जे गरजेचे आहे त्याची इच्छा उठण्यापूर्वी, मागण्यापूर्वी आणि अपेक्षेपेक्षा, गरजेपेक्षा ज्यादा मिळणे म्हणजे सिद्धी. साधकाला अध्यात्मिक मार्गावर विविध सिद्धी प्राप्त होत असतात. जर त्यांचा गैरवापर केला किंवा त्यांच्या मागे धावाल तर त्या नाहीशा होतील. तुम्ही स्व मध्ये स्थिर असाल तेंव्हाच तुम्हाला सच्च्या ज्ञानाची प्राप्ती होईल,तेंव्हाच



समतोल न ढळण्याची खात्री असेल.गुरुपरंपरेला येथे खूप महत्व आहे. साधकाने गुरुपरंपरेच्या ज्ञानमार्गावरच वाटचाल करावी. सिद्धीधात्री सर्व इच्छापुर्ती करून सिद्धींची आपोआप प्राप्ती करून देते.गुरुकृपेमुळे प्राविण्य आणि मुक्तीया सिद्धीधात्रीने दिलेल्या देणग्या आहेत.

---

येत्या 22 सप्टेंबरपासून नवरात्रीची सुरुवात होणार आहे. शारदीय नवरात्रीची स्थापना अश्विन महिन्याच्या शुल्क पक्षाच्या प्रतिपदेला केली जाते. या दिवसात भाविक मनोभावे देवीची पूजा करत उपवास करतात. दुर्गेचा आशीर्वाद कायम आपल्यावर राहण्यासाठी या दिवसात विशेष मंत्र किंवा ग्रंथाचे पठण करावे, असे सांगितले जाते. आज आपण जाणून घेऊयात, नवरात्रीत कोणत्या ग्रंथाचे पठण करायला हवे, ज्यामुळे सर्व संकडे, समस्या दूर होण्यास मदत होईल.

या ग्रंथाचे करा पठण

दुर्गा सप्तशती - नवरात्री उत्सवात दुर्गा सप्तशती या ग्रंथाचे पठण करावे, असे सांगितले जाते. या ग्रंथामध्ये देवीच्या माहात्माची कथा आहे. असे बोलले जाते की, याचे वाचन नवरात्रीत केल्यास देवीची असीम कृपा आपल्यावर राहते.

दुर्गा सप्तशतीशिवाय तुम्ही देवीचा ओम दुम दुगार्यै नमः मंत्रांचा जप करू शकता. तसेच संकटापासून मुक्ती मिळवण्यासाठी दुर्गा चालिसाचे पठण करणे लाभदायी ठरेल.

दुर्गेची पूजा करताना या गोष्टी महत्त्वाच्या - नवरात्री दरम्यान, देवीची पूजा करताना तुमचे तोंड पूर्व किंवा उत्तर दिशेला तोंड असणे शुभ मानले जाते.

देवीला प्रसन्न करण्यासाठी घराच्या मुख्य द्वारावर दररोज स्वास्तिक चिन्ह काढावे. चिन्ह बनवताना यामध्ये चुना आणि

हळदीचा वापर करावा. तसेच हे चिन्ह दरवाज्याच्या दोन्ही बाजूला बनवा.

घराच्या चौकटीवर आंबाच्या पानांचे तोरण देखील लावा.

पूजेमध्ये सुंगधी फुलांचा वापर करा.

तसेच यासोबत वस्त्र, कुंकू, चंदन, साडी, चुनरीचा वापर करा.

घटस्थापनेचा शुभ मुहूर्त - यंदा घटस्थापनेचा शुभ मुहूर्त 22 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 06 वाजून 09 मिनिटांपासून ते सकाळी 08 वाजून 06 मिनिटांपर्यंत असणार आहे. याशिवाय घटस्थापनेचा अभिजित मुहूर्त सकाळी 11 वाजून 49 मिनिटांपासून ते दुपारी 12 वाजून 38 मिनिटांपर्यंत असेल. अभिजित मुहूर्त हा दिवसाचा सर्वात शुभ काळ असतो. या काळात तुम्ही घटस्थापना करू शकता.



# नवरात्रीत अखंड ज्योत का लावली जाते? वाचा काय आहेत नियम

गणेशोत्सवानंतर शारदीय नवरात्री हा देशभरात थाटामाटात साजरा केला जाणारा सण आहे. शारदीय नवरात्रीची स्थापना अश्विन महिन्याच्या शुल्क पक्षाच्या प्रतिपदेला केली जाते. या दिवसात अखंड ज्योत प्रज्वलित करण्याला विशेष महत्त्व दिले जाते. याच्याशिवाय देवीची पूजा अपूरी समजली जाते. पहिल्या दिवशी कलश स्थापना केल्यानंतर अखंड ज्योत प्रज्वलित ठेवावी असे सांगितले जाते. अखंड ज्योत प्रज्वलित करण्याचे नियम काय आहेत समजून घेऊयात आणि ती का लावली जाते समजून घेऊयात,

नवरात्रीत अखंड ज्योत का लावली जाते?

हिंदू धर्मात कोणतेही शुभ कार्य करण्यापूर्वी दिवा लावला जातो. यामागे असे कारण सांगितले जाते की, दिव्याचा प्रकाश आयुष्यामध्ये उन्नतीचे प्रतीक आणतो, दिव्याने सकाराकत्मक ऊर्जा वाढते. त्यामुळे नवरात्रीच्या दिवसांमध्ये पूर्ण 9 दिवसांपर्यंत अखंड ज्योत लावली जाते. कारण अखंड ज्योतीला देवीचे स्वरूप मानले जाते आणि त्याची पूजा केली जाते. जर तुम्ही घरी दुगार्मातेची प्रतिमा स्थापन करणार असाल तर अखंड ज्योत अवश्य प्रज्ज्वलित करा आणि नऊ दिवस ती विझणार नाही याची काळजी घ्या.

अखंड ज्योत लावण्याचे नियम - शुभ मुहूर्त पाहून शारदीय नवरात्राच्या पहिल्या दिवशी कलशाची स्थापना करावी.

जर अखंड ज्योत तुम्ही घरामध्ये लावत असाल तेव्हा घरामध्ये योग्य दिशा पाहावी.

घरामध्ये कोणतीही अपवित्र गोष्ट ठेऊ नये.

या काळात ब्रह्मचयार्चे पालन करावे.

9 दिवस मांसाहार करू नये.

जर ज्योत देवीच्या मूर्तीजवळ ठेवत असाल तर तेलाचा दिवा देवीच्या डाव्या बाजूला आणि तूपाचा दिवा उजव्या बाजूला ठेवणे शुभ मानले जाते.

ज्योत ही पूर्व, पश्चिम किंवा उत्तर दिशेला असावी. चुकूनही दक्षिण दिशेला ठेवू नये.

अखंड ज्योत नवरात्रीचे नऊ दिवस विझू देऊ नये,कारण हे अशुभ मानले जाते.

ज्योत घरामध्ये स्वच्छ ठिकाणी ठेवावा.

9 दिवस झाल्यानंतर जर ज्योत जळत असेल तर फुंकर मारुन विझवू नये, असे करणे अशुभ मानले जाते.

ज्योत आपोआप विझू द्यावी.



---

# घटस्थापनेचा शुभ मुहूर्त, साहित्य आणि पूजा विधी



गणेशोत्सवानंतर शारदीय नवरात्री हा देशभरात थाटामाटात साजरा केला जाणारा सण आहे. दरवर्षी शारदीय नवरात्रीची स्थापना अश्विन महिन्याच्या शुल्क पक्षाच्या प्रतिपदेला केली जाते. या काळात नऊ दिवस देवीच्या नऊ विविध रुपांची पूजा केली जाते. या काळात भाविक मनोभावे देवीची पूजा करत उपवास करतात.

यंदा येत्या 22 सप्टेंबरपासून नवरात्रीची सुरुवात होणार आहे. नवरात्रीत घटस्थापनेच्या विधीचे विशेष महत्व असते. अनेकजण आपल्या घरात कुलदेवीचे घट बसवतात. त्यानिमित्त आपण घटस्थापनेचा शुभ मुहूर्त, पूजेसाठी लागणारे साहित्य आणि पूजा विधी जाणून घेऊयाङ्ख

कधीपासून सुरू होत आहे नवरात्री?

आता सर्वात आधी नवरात्री कधीपासून सुरू होत आहे ते जाणून घेऊयाङ्ख तर हिंदू पंचांगानुसार, या वर्षी शारदीय नवरात्रीची सुरुवात 22 सप्टेंबर 2025 पासून होणार आहे आणि 2 ऑक्टोबर 2025 रोजी विजयादशमी असणार आहे. आता यंदाचा नवरात्री उत्सव खास असणार आहे कारण हा उत्सव यंदा नऊ नव्हे तर दहा दिवसांचा असणार आहे. त्याचे कारण म्हणजे यंदा तृतीया तिथी ही दोन दिवस असणार आहे. म्हणजेच 24 आणि 25 सप्टेंबर रोजी दोन्ही तृतीया तिथी असेल. त्यामुळेच यंदा 11 व्या दिवशी विजयादशमी म्हणजेच दसरा असणार आहे.

घटस्थापनेचा शुभ मुहूर्त

यंदा घटस्थापनेचा शुभ मुहूर्त 22 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 06 वाजून 09 मिनिटांपासून ते सकाळी 08 वाजून 06 मिनिटांपर्यंत असणार आहे. याशिवाय घटस्थापनेचा अभिजित मुहूर्त सकाळी 11 वाजून 49 मिनिटांपासून ते दुपारी 12 वाजून 38 मिनिटांपर्यंत असेल. अभिजित मुहूर्त हा दिवसाचा सर्वात शुभ काळ असतो. या काळात तुम्ही घटस्थापना करू शकता.

घटस्थापना पूजा साहित्य

हिंदू धर्मात सर्व शुभ कार्यात कलश स्थापित करणे महत्त्वाचे मानले जाते. हे सुख, समृद्धी आणि ऐश्वर्य यांचे प्रतीक मानले जाते. घटस्थापनेच्या पूजेत फार कमी साहित्य लागते. प्रत्येकजण आपल्या पद्धतीनुसार हे साहित्य कमी जास्त करू शकते.

पंच पल्लव (आंब्याचे पान, पिंपळाचे पान, वडाचे पान, गूळाचे पान, उंबराचे पान) पंच पल्लव उपलब्ध नसल्यास

आंब्याची पाने, देवीची मूर्ती किंवा फोटो, मातीचा दिवा, नाणे, गहू, ज्वारी किंवा सप्तधान्य, स्वच्छ माती, मातीचे भांडे, कुंकू, चिरंतन ज्योतीसाठी पितळेचा दिवा, लाल किंवा पिवळे कापड, गंगाजल, कापसाची वात, मध, कापूर, अत्तर, तूप, हळद, गूळ, उदबत्ती, नैवेद्य, सुपारीची पाने, नारळ आणि फुले,

घटस्थापना पूजा विधीः

नवरात्रीच्या पहिल्या दिवशी कलशाची स्थापना करताना सर्वप्रथम सर्व देवी-देवतांचे आवाहन करावे.

एका मोठ्या मातीच्या भांड्यात माती टाकून त्यात गहू, ज्वारी किंवा सप्तधान्याचे दाणे टाका. त्यावर थोडे पाणी शिंपडा.

आता गंगाजलाने भरलेल्या कलशावर रक्षासूत म्हणजेच लाल धागा बांधा. तसेच पाण्यात सुपारी, दुर्वा, अक्षदा आणि नाणे टाकावे.

आता कलशाच्या काठावर ५ विड्याची पाने किंवा आंब्याची पाने ठेवा.

एक नारळ घेऊन त्याला लाल कापडाने गुंडाळा. नारळावर लाल धागा बांधा.

यानंतर कलश आणि धान्याचे मातीचे भांडे स्थापित करण्यासाठी, चौरंग घ्या किंवा प्रथम जमीन पूर्णपणे स्वच्छ करा.

यानंतर धान्याचे भांडे ठेवावे. त्यानंतर कलश स्थापित करा आणि नंतर कलशावर नारळ ठेवा.

त्यानंतर सर्व देवी-देवतांना आमंत्रण देऊन नवरात्रीची विधिवत पूजा सुरू करा.

घट बसवल्यानंतर नऊ दिवस देवघरात सकाळ संध्याकाळ आवश्यकतेनुसार अखंड ज्योत तेवत ठेवण्यासाठी काळजी घ्यावी, आणि धान्याच्या मातीच्या भांड्यात पाणी टाकत राहावे.

# मुंबई महापालिकेच्या मुदत ठेवी ८० हजार कोटींवर, सात महिन्यांत एक हजार कोटींची घट




**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

एकेकाळी ९० हजार कोटींच्या पुढे गेलेल्या मुंबई महापालिकेच्या मुदत ठेवी आता तब्बल ८० हजार कोटींवर आल्या आहेत. मुदत ठेवींचा वापर मोठ्या प्रमाणावर विकासकामांसाठी केला जात असून गेल्या दोन अडीच वर्षात मुदत ठेवी कमी होऊ लागल्या आहेत. प्रशासनाने ४ फेब्रुवारी रोजी मुंबई महापालिकेच्या चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात सादर केला. त्यावेळी पालिकेच्या मुदत ठेवी ८१ हजार कोटींवर होत्या. गेल्या सात महिन्यांत त्या ८० हजार कोटींवर आल्या आहेत. देशातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका अशी ख्याती असलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या मुदत ठेवी सातत्याने कमी होत आहेत. पालिकेच्या विविध विभागांच्या अधिशेष रकमेच्या मुदत ठेवी विविध बँकांमध्ये असतात. सर्वाधिक व्याजदर देणाऱ्या बँकांमध्ये या मुदत ठेवी गुंतवण्यात आल्या आहेत. त्या मुदत ठेवींवरून पालिकेच्या आर्थिक स्थितीचा अंदाज येतो. पालिकेच्या या मुदत ठेवीमधूनच आस्थापना खर्च व निवृत्त कर्मचाऱ्यांची देणी देण्यात येतात. तसेच विविध विकासकामांसाठी कंत्राटदारांकडून घेतलेल्या अनामत रकमांचा या ठेवीमध्ये समावेश असतो. करोना काळानंतर बांधकामाच्या अधिमूल्यात सवलत देण्यात आली होती. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर बांधकाम क्षेत्राला चालना मिळाली व पालिकेला मार्च २०२२ मध्ये १४ हजार ७५० कोटी रुपये महसूल मिळाला होता. त्यामुळे पालिकेच्या मुदत ठेवी मार्च २०२२ मध्ये तब्बल ९१ हजार कोटी रुपयांच्या पुढे गेल्या होत्या. मात्र त्यानंतर या मुदत ठेवींना उतरती कळा लागली. जून २०२५ मध्ये या मुदत ठेवी ८०,७४० कोटींवर आल्या आहेत. २०२१ -२२ च्या तुलनेत २०२२-२३ च्या मुदत ठेवींची रक्कम पाच हजार कोटींनी कमी झाली होती. तर यंदा या मुदत ठेवीत आणखी घट झाली असून जून २०२५ मध्ये या मुदत ठेवी ८० हजार कोटींवर आल्या आहेत. फेब्रुवारी महिन्यात अर्थसंकल्प सादर करताना पालिकेच्या एकूण ८१,७७४ कोटी रुपयांच्या मुदत ठेवी होत्या. गेल्या काही वर्षांपासून पालिकेच्या मुदतठेवीतील काही भाग विकास प्रकल्पांसाठी राखीव ठेवला जात आहे. सागरी किनारा प्रकल्प, गोरेगाव झ्र मुलुंड जोड रस्ता, मलनिस्सारण प्रकल्प असे मोठ्या खचार्चे आणि दीर्घकाळ चालणारे प्रकल्पांचा निधी हा मुदत ठेवींमधील राखीव निधीशी संलग्न केलेला आहे. त्यामुळे या प्रकल्पांची देणी दिल्यानंतर मुदत ठेवी कमी होत जातात. पालिकेने गेल्या काही वर्षांपासून राखीव निधी वापरण्यास सुरुवात केली असून या आर्थिक वर्षात आणखी १६ हजार कोटी रुपयांच्या मुदत ठेवी प्रकल्पांसाठी संलग्न करण्यात आल्या आहेत.

अडीच लाख कोटींचे दायित्व

पालिकेने गेल्या दोन - तीन वर्षांत मोठमोठे पायाभूत सुविधांचे प्रकल्प हाती घेतले असून या प्रकल्पांची कामे पुढील दोन ते पाच वर्षे चालणार आहेत. त्यात रस्त्यांची कॉंक्रीटीकरणाची कामे, रस्ते, पूल, वसोर्वा दहिसर सागरी किनारा मार्ग आणि दहिसर - भाईंदर जोड रस्ता, गोरेगाव - मुलुंड जोड रस्ता अशा विविध प्रकल्पांमुळे पालिकेला तब्बल दोन ते अडीच लाख कोटींचे दायित्व आहे.

मुदत ठेवी

२०१८-१९ ......७६,५७९.२९ कोटी
२०१९-२०......७९,११५.६० कोटी
२०२०-२१ ......७८,७४५.४६ कोटी
२०२१-२२ ......९१.६९०.८४ कोटी
२०२२-२३......८६,४०१.५३ कोटी
२०२३-२४ ......८४,८२४ कोटी
२०२४-२५ ......८१,७७४ कोटी
जून २०२५ ......८०,७४० कोटी

# उपनगरीय गाड्यांचे पाच वर्षात शटल सेवेत रुपांतर लोकल फेऱ्या वाढविण्यासाठी ५,८०० कोटींचा प्रकल्प

**■मुंबई । प्रतिनिधीः**

अवेळी लोकल सेवा, लोकलच्या फेऱ्या वाढविण्यावर मयार्दा, गर्दीमुळे प्रवाशांचा होणारा मृत्यू यावर उपाय म्हणून मध्य रेल्वेने नवीन प्रस्ताव तयार केला आहे. लोकल फेऱ्यांची संख्या वाढविण्यासह त्यांची वारंवारता वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी साधारणपणे ५,८०० रुपये खर्च अपेक्षित आहे. पुढील पाच वर्षांनी मुंबईची जीवनवाहिनी असलेली लोकल शटल सेवेत रुपातरित करण्याचे नियोजन आहे.

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाचे माजी विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) रजनीश गोयल व रेल्वे अधिकाऱ्यांनी हा प्रस्ताव तयार केला होता. गेल्यावर्षी रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांच्याकडे हा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. आश्विनी वैष्णव यांनी या प्रकल्पाचे कौतुक करून, या प्रकल्पाला तत्त्वतः मंजुरी दिली. या प्रकल्पासाठी निधीची चिंता करू नये, असे आश्वासन दिले होते. या प्रकल्पामुळे मुंबईकरांचा प्रवास वेळेत आणि गर्दी विभाजित करण्यास मदत होणार आहे. सध्याच्या उपनगरीय रेल्वेला आठ विभागात विभागून गर्दीच्या वेळी दर चार मिनिटांनी एका लोकलची वारंवारता वाढवण्याचा उद्दिष्ट्य आहे. लोकल फेऱ्यांची वारंवारता वाढविण्यासाठी, कमीत कमी वेळेत इच्छित स्थानक गाठण्यासाठी हा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. आश्विनी वैष्णव यांच्यासमोर या प्रस्तावाचे सादरीकरण करण्यात आले. या प्रस्तावाबाबत ते सकारात्मक



आहेत. या प्रस्तावाची तातडीने अंमलबजावणी होणे शक्य नाही. परंतु, पायाभूत सुविधा, अभियांत्रिकी कामे पूर्ण झाल्यास हा प्रकल्प यशस्वी ठरेल. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी अंदाजे ५,८०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे, अशी माहिती मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नाव जाहीर न करण्याच्या अटीवर दिली.

या प्रस्तावाबद्दल सखोल चौकशी व खात्री केल्यानंतरच याबद्दलची पुढील कार्यवाही करण्यात येईल. झ्र डॉ. स्वप्नील नीला, मुख्य जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे

विभाग - लोकल फेऱ्यांमध्ये वाढ - लोकलची वारंवारता

सीएसएमटी - ठाणे (धीम्या) - ३७ - ४ मिनिटे

ठाणे - कल्याण (धीम्या) - ५४ झ्र ४ मिनिटे

सीएसएमटी - कल्याण (जलद) - २१० - ४ ते ६ मिनिटे

ल्याण - कसारा (धीम्या) - ३२८ - ४ ते ६ मिनिटे

कल्याण - कर्जत (धीम्या) - २७२ - ४ ते ६ मिनिटे

कर्जत - खोपोली - ८६ - २० मिनिटे

कळवा/ठाणे -वाशी/नेरुळ - १३८ - ६ मिनिटे

सीएसएमटी - पनवेल (धीम्या) - १६ - ४ ते ६ मिनिटे

- सीएसएमटी ते ठाणे (धीम्या) या विभागात सहा उप मार्गिका (स्टॅबलिंग लाइन) आणि सीएसएमटी ते कल्याण (जलद) या विभागात कुर्ला येथे १४ आणि ठाकुर्ली येथे २० उप मार्गिका तयार कराव्या लागणार आहेत.

- लोकल रेक २३८ वाढवावे लागतील.

# बेकायदा इमारतींबाबत उच्च न्यायालयाच्या प्रश्नाला सरकारची बगल

**■मुंबई । प्रतिनिधीः**

वाशी येथील दोन बेकायदा इमारतींच्या पाडकामाबाबत नवी मुंबई महापालिकेने बजावलेल्या नोटिशींना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोणत्या अधिकारात स्थगिती दिली? असा प्रश्न करून उच्च न्यायालयाने त्याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले होते. तथापि, न्यायालयाच्या या आदेशावर उत्तर दाखल करण्याऐवजी याचिकेच्या स्वरूपावरच सरकारतर्फे शनिवारी प्रश्न उपस्थित करण्यात आला. उपमुख्यमंत्र्यांच्या निर्णयाला कॉन्शस सिटीझन्स फोरम या स्वयंसेवी संस्थेने उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. तसेच, उपमुख्यमंत्र्यांचा आदेश बेकायदा ठरवून तो रद्द करण्याची आणि महापालिकेने बजावलेल्या पाडकाम नोटिशीच्या अंमलबजावणीची मागणी केली आहे. इमारतींना निवासी प्रमाणपत्रे नसतानाही अनेक सदनिकांची तृतीय पक्षाला विक्री केल्याचे प्रकार २२ वर्षांनंतरही बेकायदा पद्धतीने सुरू असल्याचा याचिकाकर्त्यांचा दावा आहे. न्यायमूर्ती घुगे आणि न्यायमूर्ती भोबे यांच्या खंडपीठाने मागील सुनावणीच्या वेळी बेकायदा बांधकाम प्रकरणाच्या सर्व बाबी तपासल्यानंतर या प्रकाराची गंभीर दखल घेतली. तसेच, महापालिकेने बेकायदा बांधकामांना कायद्याप्रमाणे नोटीस



बजावून कारवाईची प्रक्रिया सुरू केलेली असताना, उपमुख्यमंत्र्यांनी कोणत्या अधिकारात या नोटिशींना स्थगिती दिली? नियोजन प्राधिकरणांच्या अशा कारवायांना अशी स्थगिती देण्याचा अधिकार नगर विकासमंत्री म्हणून उपमुख्यमंत्र्यांना आहे का ? असा प्रश्न खंडपीठाने उपस्थित केला होता.

प्रकरण काय ?

- वाशीमधील अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन कंडोमिनियम नंबर-१४ आणि नैवेद्या को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी कंडोमिनियम नंबर-३ या सिडकोच्या इमारतींचे बांधकाम २००३ मध्ये विनापरवानगी पाडण्यात आले. असोसिएशनने स्थानिक नगरसेवक व शिवसेनेचे बेलापूर विधानसभा क्षेत्राचे जिल्हाध्यक्ष किशोर पाटकर यांच्याशी हातमिळवणी करून हा प्रकार केला. सिडकोने याची गंभीर दखल घेत असोसिएशन व संबंधितांना नोटिसा बजावल्या.

# पवित्र पोर्टलवरून उच्च न्यायालयाने शिक्षण विभागाला फटकारले

**■मुंबई । प्रतिनिधीः**

योग्य प्रकारे कार्यान्वित नसलेल्या राज्य सरकारच्या पवित्र पोर्टलऐवजी थेट शिक्षण संस्थांनी केलेल्या शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द करण्यावरून उच्च न्यायालयाने शनिवारी राज्याच्या शिक्षण विभागाला फटकारले.तसेच, थेट भरती झालेल्या शिक्षकांच्या नियुक्त्या नियमित करण्याचे १००हून अधिक आदेश देऊनही त्याचा काही उपयोग झाला नसल्याची उद्विग्नताही व्यक्त केली. पवित्र पोर्टलचा वापर कसा करायचा याचे धडे खुद्द राज्याच्या महाधिवक्त्यांनी विविध परिसंवादाद्वारे राज्यातील शिक्षण अधिकाऱ्यांना दिले आहेत. तरीही शिक्षण अधिकारी त्याबाबत शिक्षित झालेले नाहीत, असे ताशेरेही न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती अश्विन भोबे यांच्या खंडपीठाने ओढले. शिक्षकांच्या नियुक्त्यांना मान्यता देण्यास नकार देणाऱ्या शिक्षण अधिकाऱ्यांचा आदेश रद्द करण्याच्या मागणीसाठी एक शिक्षिका आणि दोन संस्थांनी स्वतंत्र याचिका केल्या आहेत. पवित्र पोर्टल हे राज्य सरकारच्या शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाचा एक भाग असून जिल्हा परिषद व महानगरपालिका शाळांसाठी ऑनलाइन शिक्षक भरती हाताळण्यासाठी सुरू करण्यात आले आहे. तथापि, हे पोर्टल योग्यप्रकारे कार्यान्वित नाही. तरीही त्याद्वारे नियुक्ती केली नसल्याचे कारण देऊन शिक्षण अधिकाऱ्यांकडून शिक्षकांच्या नियुक्तीला मान्यता दिली जात नसल्याचा आरोप याचिकांमध्ये करण्यात आला आले. न्यायालयाने या याचिकांची दखल घेऊन प्रत्येक शिक्षकाला त्याची नियुक्ती मंजूर करून घेण्यासाठी न्यायालयात का यावे लागते, असा



प्रश्न केला. तसेच, पोर्टलद्वारे आतापर्यंत किती शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या हेही स्पष्ट करण्यास सांगितले.अनेक शिक्षकांच्या नियुक्त्या पोर्टलद्वारे न केल्याने त्यांना मंजुरी देण्यात आलेली नाही याची दखल घेऊन हे प्रकरण पूर्णपीठाकडे पाठवण्याचे मतही व्यक्त केले. न्यायालयाने यावेळी याचिकाकर्त्या शिक्षकांबद्दल सहानुभूती व्यक्त करताना शिक्षण अधिकाऱ्यांना आदेश देऊन आणि कारवाई करून आम्ही थकलो आहोत. त्यामुळे, याचिकांद्वारे उपस्थित केलेला मुद्दा लक्षात घेता पवित्र पोर्टल कसे वापरले जावे याबाबत मार्गदर्शक तत्त्वे काढण्याचा आदेश देण्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. दरम्यान, न्यायालयाने उपरोक्त इशारा दिल्यानंतर अतिरिक्त सरकारी वकील मनीष पाबळे यांनी प्रकरण पुन्हा सादर केले. तसेच, राज्याची बाजू मांडण्यासाठी एक आठवड्याची मुदत मागितली. त्यानंतर खंडपीठाने पुढील आठवड्यात याचिकेवर सुनावणी ठेवली.

# ‘रेलनीर’ पाण्याची बाटली झाली स्वस्त; २२ सप्टेंबरपासून स्वस्त दरात मिळणार पाणी

**■मुंबई । प्रतिनिधीः**

रेल्वे स्थानक आणि लांबपल्याच्या रेल्वेगाड्यांमध्ये रेलनीर बाटलीबंद पाण्याचा पुरवठा केला जातो. रेल्वे मंडळाने २० सप्टेंबर रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार, रेलनीर बाटली एक रुपयाने स्वस्त होणार आहे. त्यामुळे एका लिटर पाण्याच्या बाटलीसाठी १५ रुपयांऐवजी १४ रुपये आणि ५०० मिली बाटलीसाठी १० रुपयांऐवजी ९ रुपये द्यावे लागणार आहेत. संपूर्ण देशभरातील रेल्वे विभागात सुधारित दर २२ सप्टेंबरपासून लागू होतील. रेलनीर बाटलीबंद पिण्याचे पाणी हा भारतीय रेल्वेचा ब्रॅंड असून इंडियन रेल्वे कॅटरिंग अँड टूरिझम कॉर्पोरेशनतर्फे (आयआरसीटीसी) रेलनीर बाटल्यांच्या पाण्याचा पुरवठा रेल्वे स्थानकात आणि मेल-एक्स्प्रेसमध्ये केला जातो.




मध्य रेल्वेवरील सीएसएमटी - कसारा/कर्जत, पश्चिम रेल्वेवरील चर्चगेट - विरारपर्यंत सर्व रेल्वे स्थानकांत, हार्बर मार्गावरील सर्व रेल्वे स्थानके, वापी आणि वलसाड स्थानकांत ह्यरेलनीरह्व बाटलीबंद पाण्याचा पुरवठा केला जातो.

परंतु, काही वेळा रेलनीरचे उत्पादन घटल्यावर पाण्याच्या बाटल्यांचा अपुरा पुरवठा होतो. यावेळी भारतीय रेल्वेने निवडलेल्या इतर ब्रॅंडच्या पाण्याच्या बाटल्या विकल्या जातात. या बाटल्यांच्या किमतीतही बदल करण्यात आला आहे. एक लिटरच्या बाटलीची किंमत १५ रुपयांवरून १४ रुपये, तर, ५०० मिली बाटली १० रुपयांऐवजी ९ रुपये करण्यात आली आहे.

भारतीय रेल्वेचे सर्व महाव्यवस्थापक आणि आयआरसीटीसीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालकांसाठी एक परिपत्रक जारी करण्यात आले आहे. या परिपत्रकात सर्व संबंधित विभागांना २२ सप्टेंबरपासून नवीन दरांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आयआरसीटीसीच्या पश्चिम विभागाचे सात रेलनीर प्रकल्प कार्यान्वित आहेत. या प्रकल्पातून दररोज लाखो रेल्वे प्रवाशांना स्वच्छ आणि शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. अंबरनाथ, बुटीबोरी (नागपूर), मानेरी (जबलपूर), मंडीदीप (भोपाळ), कुबेर एक्सटेंशन रामपुरा (राजस्थान), साणंद (गुजरात), औद्योगिक क्षेत्र (भुसावळ) या सात ठिकाणी रेलनीरच्या पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांचे उत्पादन होते. अंबरनाथ येथील प्रकल्पात प्रतिदिन सुमारे १,७४,००० बाटल्या तयार केल्या जातात. तर, उर्वरित प्रत्येक प्रकल्पात प्रतिदिन अंदाजे ७२ हजार बाटल्या तयार केल्या जातात.

# निवृत्तीवेतनासाठी मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ आंदोलनाच्या पवित्र्यात



**■मुंबई । प्रतिनिधीः**

सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची सर्व देयके सहा महिन्यांत अदा करण्याचे शासन अध्यादेशात नमूद असतानाही संबंधितांचे निवृत्ती वेतन आणि इतर देणी प्रलंबित असल्याचे मुंबई विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे निवृत्ती वेतनासह विविध मागण्या लवकर पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघाने दिला आहे. तसेच यासंदभार्तील निवेदनही मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री आणि मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूंना देण्यात आले आहे. मुंबई विद्यापीठातील शासन अनुदानित एकूण १२७ शिक्षकेत्तर कर्मचारी २०१७ पासून नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त झाले. यापैकी १२ सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचे निधन झाले, तर काही शिक्षकेत्तर कर्मचारी आजारी आहेत. परिणामी, त्यांच्या कुटुंबियांना मानसिक त्रास सहन करावा लागत असून आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मुंबई विद्यापीठाकडून संबंधित प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे वेळोवेळी पाठविण्यात आला आहे. मात्र शासनाच्या संबंधित विभागाकडून वारंवार नवीन कागदपत्रांची मागणी करून प्रस्ताव परत पाठवण्यात येत आहे. त्यानंतर सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून विद्यापीठाकडून पुन्हा माहिती सादर करण्यात आली आहे. परंतु तरीही सदर विषय मार्गी लागलेला नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांकडे पत्रव्यवहार केला आहे, आमच्या बैठकाही सुरू आहेत.

# १९ वर्षीय तरुणीकडे शरीरसुखाची मागणी, मंदिरात पुजाऱ्याची आत्महत्या

**■मुंबई । प्रतिनिधीः**

१९ वर्षीय तरुणीकडे शरीरसुखाची मागणी करणाऱ्या पुजाऱ्याने मंदिरात गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. राजेश गोस्वामी (५२) असे मृत पुजाऱ्याचे नाव आहे. तो कांदिवलीच्या लालजीपाडा येथील तारकेश्वर महादेव मंदिरात पुजारी होता. शनिवारी सकाळी हा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी तरुणीने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यामुळे अटक आणि बदनामीच्या भीतीपोटी त्याने हे पाऊल उचलल्याचे पोलिसांनी सांगितले

मंदिरात आढळला मृतदेह



राजेश गोस्वामी (५२) हा पुजारी म्हणून काम करत होता. कांदिवलीच्या गणेशनगर येथील लालजीपाडा मधील तारकेश्वर महादेव मंदिरात तो पुजारी होता. शनिवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास मंदिरात गळ्यातील उपरण्याने त्याने पंख्याला गळफास लावून आत्महत्या केली होती. त्याची माहिती मिळताच कांदिवली पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पंचनामा केला आणि उत्तरीय तपासणीसाठी कांदिवलीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर (शताब्दी) रुग्णालयात पाठवला.

त्याने आत्महत्येपूर्वी कुठलीही चिठ्ठी लिहिलेली नव्हती. या प्रकरणी कांदिवली पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली आहे.

तरुणीकडे केली शरीरसुखाची मागणी

गोस्वामी याने आत्महत्या का केली त्याचा पोलीस तपास करत होते. त्यात धक्कादायक कारण समोर आले. कांदिवली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या परिसरातर राहणारी एक १९ वर्षीय तरुणी या मंदिरात जात असे. मृत पुजारी राजेश गोस्वामी याने या तरूणीला मेसेज करून शरीरसुखाची मागणी केली होती. संतापलेल्या तरुणीने हा प्रकार आपल्या वडिलांना सांगितला. शुक्रवारी दुपारी दिडच्या सुमारास तरुणी तिच्या वडिलांना घेऊन तक्रार करण्यासाठी कांदिवली पोलीस ठाण्यात गेली. पोलिसांनी त्यांना सकाळी गुन्हा दाखल करण्यास बोलावले. दरम्यान, पोलिसांनी पुजाऱ्याचा शोध सुरू केला होता. परंतु तो आढळला नाही. दुर्सऱ्या दिवशी गोस्वामीचा मृतदेह मंदिरात पंख्याला लटकलेल्या अवस्थेत आढळला.

७ वर्षांपासून मंदिरात पुजारी

राजेश गोस्वामी (५२) हा मूळचा मध्यप्रदेशातील होता. तो विवाहित असून त्याला २ मुले आणि २ मुली आहेत. त्याचा एक मुलगाही पुजारी आहे. याप्रकरणी अधिक तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com